॥ सा विद्या या विमुक्तये ॥
स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड
'ज्ञानतीर्थ', विष्णुपुरी, नांदेड – ४३१ ६०६ (महाराष्ट्र राज्य) भारत
SWAMI RAMANAND TEERTH MARATHWADA UNIVERSITY, NANDED
'Dnyanteerth', Vishnupuri, Nanded - 431 606 (Maharashtra State) INDIA
Established on 17th September, 1994, Recognized By the UGC U/s 2(f) and 12(B), NAAC Re-accredited with'B++' grade

Fax : (02462) 215572 | Public Relations Office (PRO) | website: srtmun.ac.in
Phone: (02462) 215325 | जनसंपर्क कार्यालय | E-mail: pro@srtmun.ac.in

संदर्भ क्र.: ज.का./२०२३-२४/२८६ दि.०२/०१/२०२४

## 'स्वारातीम' विद्यापीठातील व्यंकटी हंबर्डे सेवानिवृत्त

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठातील मजूर व्यंकटी हंबर्डे हे कर्मचारी दि. ३१ डिसेंबर रोजी नियतवयोमानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांचा सेवानिवृत्तीचा कार्यक्रम दि. ३० डिसेंबर रोजी विद्यापीठाच्या अधिसभा सभागृहामध्ये आयोजित करण्यात आला होता. यावेळी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी सेवानिवृत्त सत्कारमूर्तीचे शाल, श्रीफळ व स्मृती चिन्ह देऊन सकुटुंब सत्कार केला.

विद्यापीठातील मजूर कर्मचारी व्यंकटी हंबर्डे दि. ३१ सप्टेंबर रोजी नियतवयोमानानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी एकूण १९ वर्ष सेवा विद्यापीठाला दिली आहे.

आयोजित कार्यक्रमात विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी या कर्मचाऱ्यास त्यांनी विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल कौतुक केले. आणि पुढील जीवन सुखीं, समृद्धी व आरोग्यमय लाभो अशा शुभेच्छा दिल्या. विद्यापीठाच्या प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. माधुरी देशपांडे आणि कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे यांनीही विद्यापीठास दिलेल्या उत्कृष्ट सेवेबद्दल त्यांचे अभिनंदन करून पुढील जीवनास शुभेच्छा दिल्या.

यावेळी या कार्यक्रमामध्येच विद्यापीठ दिनदर्शिकेचे प्रकाशन विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर, प्रभारी प्र-कुलगुरू डॉ. माधुरी देशपांडे, कुलसचिव डॉ. सर्जेराव शिंदे, प्र. वित्त व लेखाधिकारी डॉ. श्रीकांत अंधारे यांच्या शुभ हस्ते करण्यात आले. विद्यापीठ दिनदर्शिका समितीचे अध्यक्ष प्रा.डॉ. पी. विठ्ठल, सदस्य प्रा.डॉ. योगिनी सातारकर, प्रा. डॉ. वैजनाथ अनमुलवाड, व्यंकटेश नागरगोजे उपस्थित होते.

याप्रसंगी विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. सूर्यप्रकाश जाधव, राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. मल्लिकार्जुन करजगी, उपकुलसचिव व्यंकट रामतीर्थे, अधिसभा सदस्य शिवाजी चांदणे यांच्यासह शिक्षक, अधिकारी, कर्मचारी यांनीही व्यंकटी हंबर्डे यांना पुढील जीवन सुखीं, समृद्धी व आरोग्यमयासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन ज्ञानस्त्रोत केंद्राचे संचालक डॉ. जगदिश कुलकर्णी यांनी केले.

---